# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 127/2024 दिनांक : 07.04.2024

## 1)घरफोडी :–

**किनवट :–** दिनांक 30.03.2024 रोजी 14.00 ते दिनांक 01.04.2024 रोजी 10.00 वा. चे दरम्यान, **जिल्हा परिषद मुलांचे साईनगर, किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद जिल्हा परिषद शाळेच्या दोन खोलीत आत प्रवेश करून वन प्लस एल. इ.डी. स्मार्ट टिव्ही, संगणक संच, प्रोजेक्टर, प्रिंटर, बॅटरी, इन्व्हर्टर, साऊंड बॉक्स असे एकुण किंमती 66,000/–रूपयाचे साहित्य कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अनिलकुमार मल्लू येरेकर, वय 49 वर्षे, व्यवसाय मुख्याद्यापक जिल्हा परिषद हायस्कुल मुलांचे साईनगर, किनवट ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 94/2024 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1062 वाडगुरे, मो. नं. 8805981062** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**1)देगलूर :–** दिनांक 06.04.2024 रोजी 01.00 वा. ते 02.00 वा. चे दरम्यान, **नविन बसस्थानक चे समोर रोडचे बाजुला ऑटो पॉईंटचे बाजुला देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा नमुद ठिकाणी खाजगी वाहन हैद्राबाद येथे जाण्यासाठी मिळेल का म्हणून उभा असताना त्या ठिकाणी तिन अनोळखी ईसमांनी येवून फिर्यादीस दाबुन धरले व फिर्यादी यांनी प्रतिकार करून आराडा ओरड केली परंतु त्या ठिकाणी कोणीही नव्हते तेव्हा तिन आरोपीतांनी फिर्यादीचे खिशातील नगदी रूपये व हातातील मनगटावरील चांदीचे दोन ब्रेसलेट तसेच बोटातील सोन्याची अंगठी व मोबाईल असा एकुण 59,200/–रूपयाचा मुद्देमाल जबरीने चोरून घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी चंद्रशेखर प्रकाश जाधव, वय 26 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. चिंचाळा ता. बिलोली जि. नांदेड ह.मु. रामोजी फिल्म सिटी हैद्राबाद तेलंगना** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 163/2024 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.नं. 9130087444** हे करीत आहेत.

**2)किनवट :–** दिनांक 05.04.2024 रोजी 18.30 वा. चे सुमारास, **लोणी रोडच्या पुलाजवळ सार्वजनिक रोडवर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात तिन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे मोटार सायकलला लाथ मारून फिर्यादीस गाडीसोबत खाली पाडले व फिर्यादीची बॅग व त्यातील नगदी 68,000/–रूपये जबरीने हिसकावून फिर्यादीस मारहाण करून चोरून घेवुन पळुन गेले. वगैरे **फिर्यादी अनिल भाऊराव राठोड, वय 27 वर्षे, व्यवसाय पिन केअर मायक्रो फायनान्स मध्ये रूरल ऑफिसर रा. बेंद्री तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 93/2024 कलम 393,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री चोपडे, मो.नं. 9823162824** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**मुदखेड :–** दिनांक 04.04.2024 रोजी 07.00 वा. ते 07.30 वा. चे दरम्यान, **न्याहाळी रोड कडून रेल्वे स्टेशन मधील मोकळया जागेत मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची प्लॅटीना कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/बीएफ–0110 किंमती 15,000/– रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी भगवान चंदर कुरे, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. खुजडा ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 54/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1375 ठाकुर, मो.क्रं. 7774051375** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 07.06.2022 रोजी 13.30 वा. ते दिनांक 13.11.2022 रोजी 15.00 वा. दरम्यान, **फिर्यादीचे सासरी पेनुर ता. लोहा जि. नांदेड ह.मु. वैष्णवी प्लाझा बजाज सिटी छत्रपती चौक, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला नांदवायचे असेल तर तुझ्या माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व मानसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 144/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2701 गिते, मो.क्रं. 9307412065** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–** दिनांक 27.11.2023 रोजी 17.00 वा. ते दिनांक 04.04.2024 रोजी चे. दरम्यान, **फिर्यादीचे सासरी वृंदावन कॉलनी, शास्त्री नगर भाग्यनगर कमानी जवळ, नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला घरी राहावयाचे असेल तर तुझ्या माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व मानसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 143/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1076 ए.आर. सय्यद, मो.क्रं. 9637666815** हे करीत आहेत.

## 4)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :–**दिनांक 06.04.2024 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **वसंतनगर नाईक चौक जि.एन. बार समोर, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या एक धारदार खंजर आपले ताब्यात बाळगलेले मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/519 सरबजितसिंग गुरूचरणसिंग पुसरी, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 120/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झांबरे, मो.क्रं. 8669005593** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)वजिराबाद :–**दिनांक 05.04.2024 रोजी 21.50 वा. चे सुमारास, **दिलीपसिंग कॉलनी वजिराबाद, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आय.पी.एल. चेन्नई सुपर किंग विरूध्द सनराईज हैद्राबाद क्रिकेट मॅचवर सट्टा लावुन जुगार खेळत व खेळवित असताना मोबाईल व लॅपटॉप असा एकुण 57,000/–रूपयाचे जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. . वगैरे **फिर्यादी सपोउपनि/माधव नामदेव केंद्रे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 169/2024 कलम 4,5 म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/412 कानगुलवार, मो.क्रं. 8329585283** हे करीत आहेत.

**2)अर्धापूर :–**दिनांक 06.04.2024 रोजी 14.15 वा. चे सुमारास, **कामठा बसस्थानक जवळील विलास बंडाळे कॉम्प्लेक्स च्या पाठीमागे मोकळया जागेत ता. अर्धापूर जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या कल्याण श्रीदेवी नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना नगदी 11,750/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री दिपक साहेबराव मस्के, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 176/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1046 बोईनवाड, मो.क्रं. 9881791038** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)कंधार :–** दिनांक 06.04.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **मौजे हाटक्याळ ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2160/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/820 नामदेव तुकाराम वानरे, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 123/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2259 श्रीरामे, मो.नं. 9422176152** हे करीत आहेत.

**2)माहुर :–** दिनांक 06.04.2024 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **मौजे वानोळा ता. माहुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मोहाची गावठी दारू किंमती 3000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2128 पवनकुमार गजानन राऊत, ने. पोस्टे माहुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 45/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/764 जाधव, मो.नं. 7887687478** हे करीत आहेत.

**3)उमरी :–** दिनांक 06.04.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **मौजे गोरठा टि पॉईंट उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या सिंधी किंमती 1575/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/69 रविंद्र विठ्ठल हैबतकर, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 134/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/कदम, मो.नं. 9623658510** हे करीत आहेत.

**4)अर्धापूर :–** दिनांक 06.04.2024 रोजी 14.40 वा. चे सुमारास, **मौजे कामठा बसस्थानकासमोर मोकळया जागेत सार्वजनिक रोडवर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2850/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री दिपक साहेबराव मस्के, ने. पोस्टे अर्धापूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 175/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1046 बोईनवाड, मो.नं. 9881791038** हे करीत आहेत.

**5)मुक्रामाबाद :–** दिनांक 06.04.2024 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **मौजे हाळणी गावात जाणारे पुलाजवळ ता. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या गावठी हातभट्टी किंमती 4900/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी मपोकॉ/228 सुनिता हानमंतराव हाम्पले, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 70/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2068 कांगणे, मो.नं. 9823156052** हे करीत आहेत.

**6)देगलूर :—** दिनांक 06.04.2024 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **मौजे करडखेड गावाचे जवळ करडखेड ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1500/—रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री अश्रुदेव दिलीप पवार, ने. पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 162/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2437 इंगोले, मो.नं. 9423440472** हे करीत आहेत.

**7)उमरी :—** दिनांक 05.04.2024 रोजी 21.10 वा. चे सुमारास, **मौजे इज्जतगाव आरोपीचे किराणा दुकाना मध्ये ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2100/—रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3129 रामचंद्र पुरभाजी जाधव, ने. पोस्टे उमरी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 133/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2533 केळकर, मो.नं. 9423091612** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 128/2024 दिनांक : 07.04.2024

## नांदेड पोलीस दलातर्फे सद्भावना/एकता रॅली संपन्न झाले बाबत.

दिनांक 07.04.2024 रोजी नांदेड पोलीस दलातर्फे सद्भावना/एकता रॅली **मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली सदभावना/एकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर सदभावना/एकता रॅलीला **मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी पोलीस अधिक्षक कार्यालय येथून हिरवा झेंडा दाखवुन सुरूवात केली. पोलीस मित्र आणि वेगवेगळया शाळेचे, महाविद्यालयाचे, आर्युवेदिक कॉलेज, केंब्रीज विद्यालय, महात्मा फुले हायस्कुल, एन.सी.सी. राजश्री शाहु विद्यालय, केंद्रिय विद्यालय पोलीस कॅडेट, एम.एस.सी.आय.टी. इन्स्टीटयुट केंद्र चालक नांदेड जिल्हा, नाटय नाद बहुउद्देशिय सेवाभावी पथनाटय संस्था नांदेड, राम मोहन लोहिया कला पथक, पंचकृष्ण भजनी मंडळ सोमठाणा, पत्रकार, नांदेड शहरातील सर्व पोस्टेचे पोलीस स्टेशन प्रभारी व शाखा प्रभारी तसेच क्युआरटी, आरसीपी, पोलीस मुख्यालय येथील अंमलदार, तसेच इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला होता. सदरची सदभावना/एकता रॅली ही पोलीस अधिक्षक कार्यालय येथुन सकाळी 08.30 वा. सुरू होवुन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे महात्मा गांधी पुतळा येथे 10.30 वा. सांगता झाली.

या प्रसंगी **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांनी सद्भावना/एकता रॅली मध्ये भाग घेतलेल्या तरूणांना जात, वंश, धर्म, भेद न करता सर्व भारतीय जनतेने भावनिक ऐक्य आणि सांमजस्य ठेवतील तसेच आदर्श आचार संहितचे पालन करून आगामी येणारे सर्व <u>सण/उत्सव</u> सर्वांनी ऐकोपाने साजरे करावे असा संदेश दिला. (Whats App, Facebook, Instagram, Twitter) इत्यादी सोशल मिडीयावर सोशल मीडियाच्या माध्यमातुन आक्षपार्ह धार्मीक भावाना दुखावणारे <u>पोस्ट/शेअर/फॉरवर्ड/टिप्पणी</u> करू नये असे आवाहन केले अन्यथा कार्यवाही केली जाईल असे सांगितले. **यावेळी शिख धर्मगुरू श्री बाबा बलविंदर सिंगजी, बौध्द धर्मगुरू भंते श्री पयाबोधी, मुस्लीम धर्मगुरू मौलाना नुरूल हस्नैन, श्री शशीकांत पाटील, विश्व हिंदु परिषद** हे हजर होते त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व नांदेडकरांना धार्मीक एकता टिकवण्याचे आवाहन केले तसेच नाटय नाद बहुउद्देशिय सेवाभावी पथनाटय संस्था नांदेड यांनी आपले पथनाटयातुन, राम मोहन लोहिया कला पथक यांनी आपले कलेतुन, पंचकृष्ण भजनी मंडळ सोमठाणा यांनी आपले भजनातुन व शालेय विद्यार्थ्यांनी वेगवेगळे पोशाख धारन करून हातात हम सब एक है एक चे फलक घेवून धार्मीक एकता राखण्याचा संदेश दिला.

सदर सद्भावना/एकता रॅली करीता **मा. श्री अभिजित राऊत**, जिल्हाधिकारी, नांदेड, **मा. श्री महेशकुमार डोईफोडे**, आयुक्त महानगरपालिका नांदेड, **श्रीमती मिनल करनवाल**, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, नांदेड **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, **श्रीमती किरतिका सी.एम.**, सहा पोलीस अधिक्षक, पोलीस उप विभाग नांदेड शहर, **श्रीमती डॉ अश्विनी जगताप**, पोलीस उप–अधिक्षक (मु), **मा. श्री. उदय खंडेराय**, पोनि स्थागुशा, **मा. श्री जगदीश भंडरवार**, पोनि आर्थिक गुन्हे शाखा, नांदेड **मा. श्री विजय धोंडगे**, रापोनि पोलीस मुख्यालय, नांदेड, **श्री नौशाद पठाण**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड यांनी सहभाग नोंदवला.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


एकता रॅली
हम सब एक है।
खरा तो एकची धर्म
नांदेड जिल्हा पोलीस दल


एकता रॅली
हम सब एक है।
खरा तो एकची धर्म
जगाला प्रेम अर्पावे !
नांदेड जिल्हा पोलीस दल